पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

मुंबई ■ वर्ष १ ■ अंक १९ ■ सोमवार, दि. २२ जून २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पुष्ठे ४

■ RNI No.- MHAR/ 26 /A4530 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




# महायुतीचा 16 जागांवर विजय, महाविकास साफ

## नाशिकमध्ये बंडखोर गोकुळ गितेंचा शिंदेसेनेला धक्का

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई** महाराष्ट्र स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषदेच्या १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकीचा संपूर्ण निकाल अखेर जाहीर झाला आहे. १८ जून रोजी पार पडलेल्या या निवडणुकीत महायुतीने आपला वरचष्मा कायम राखत १७ पैकी तब्बल १६ जागांवर दणदणीत विजय मिळवला आहे. मात्र,

विधान परिषद निवडणूक निकाल



गोकूळ गिते



प्रविण पोटे

नाशिकच्या जागेवर महायुतीला मोठा धक्का बसला असून, तिथे अपक्ष उमेदवार (भाजप बंडखोर) गोकुळ गिते यांनी महायुती आणि शिवसेना शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार नरेंद्र दराडे यांचा पराभव केलाय. या निवडणुकीत महाविकास आघाडीचा सुपडा साफ झाला आहे. या निवडणुकीची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे, प्रत्यक्ष मतदानापूर्वीच १७ पैकी ६ जागांवर महायुतीचे उमेदवार बिनविरोध निवडून आले होते. त्यामुळे रविवारी उर्वरित ११ जागांसाठी मतमोजणी प्रक्रिया पार पडली. या ११ पैकी १० जागांवर महायुतीने निर्विवाद वर्चस्व मिळवले, तर एका जागेवर बंडखोराने महायुतीचे गणित बिघडवले.

### विधान परिषदेच्या ११ जागांचा निकाल

- अमरावती- प्रवीण पोटे, भाजप
- नाशिक- गोकुळ गिते, (अपक्ष) भाजपचे बंडखोर उमेदवार
- छत्रपती संभाजीनगर-जालना- सुहास शिरसाट- भाजप
- जळगाव- नंदकिशोर महाजन, भाजप
- नांदेड- अमर राजूरकर, भाजप
- सोलापूर- राजेंद्र राऊत, भाजप
- भंडारा- गोंदिया- अविनाश ब्राह्मणकर, भाजप
- सांगली- सातारा- धैर्यशील कदम, भाजप
- धाराशिव-लातूर- बीड- बसवराज पाटील, भाजप
- नागपूर- राजीव पोतदार, भाजप
- परभणी- हिंगोली- सईद खान, शिवसेना

### महायुतीचे ६ बिनविरोध निवडून आलेले उमेदवार

- ठाणे - रवींद्र फाटक - शिवसेना
- यवतमाळ - दुष्यंत चतुर्वेदी - शिवसेना
- रायगड - रत्नागिरी - सिंधुदुर्ग - अनिकेत तटकरे - राष्ट्रवादी काँग्रेस
- पुणे - विक्रम काकडे - राष्ट्रवादी काँग्रेस
- वर्धा - गडचिरोली - चंद्रपूर - अरुण लखाणी - भाजप
- अहिल्यानगर - प्राजक्त तनपुरे - भाजप

### कृष्णा नागेश पाटील आष्टीकर यांची ठाकरे गटातून हकालपट्टी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने पक्षविरोधी कारवायांबाबत कठोर भूमिका घेत कृष्णा नागेश पाटील आष्टीकर यांची पक्षातून हकालपट्टी केली आहे. यासंदर्भात खासदार संजय राऊत यांनी सोशल मीडियावर माहिती देत, 'कृष्णा नागेश पाटील (आष्टीकर) यांची पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे,' असे म्हटले आहे.

## शेतकऱ्यांच्या बॅंक खात्यात पीएम किसान सन्मान निधीचा २३ वा हप्ता वितरित



**यवतमाळ :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते वितरण ? कृषी विज्ञान केंद्रात थेट प्रक्षेपण कार्यक्रम उत्साहात कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ व कृषी विभाग, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या २३ व्या हप्त्याच्या वितरण कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण कृषी विज्ञान केंद्र, यवतमाळ येथे उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला जिल्ह्यातील शेतकरी, महिला शेतकरी, कृषी अधिकारी व विविध प्रकल्पांतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा कृषी अधीक्षक मनोजकुमार ढगे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. दीपक कच्छवे, उद्यान पंडित पुरस्कार प्राप्त शेतकरी कृष्णराव देशट्टीवार (पांढरकवडा), कीटकशास्त्र विषयातील शास्त्रज्ञ डॉ. प्रमोद मगर, गृहविज्ञान शास्त्रज्ञ स्नेहलता भागवत तसेच कृषी अभियांत्रिकी शास्त्रज्ञ राहुल चव्हाण, कृषिविद्या शास्त्रज्ञ डॉ. रुपेश झाडोदे उपस्थित होते.

## भाजपाचे प्रवीण पोटे यांची विजयी हॅटट्रिक

प्रतिनिधी २२ जून

**अमरावती :** विधान परिषदेचे महायुतीचे भाजपाचे उमेदवार प्रवीण पोटे यांनी तिसऱ्यांदा निवडून येण्याचा विक्रम केला आहे.



त्यांना तब्बल ३९० मते मिळाली. महाविकास आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार हर्षेजित देशमुख यांना खातेही उघडता आले नसल्याची त्यांच्यावर नामूसकी आली. तर वंचित बहुजन आघाडीचे डॉक्टर निलेश विश्वकर्मा यांना ३१ मते मिळाली. बोटावर मोजण्याइतके वंचित बहुजन आघाडीचे नगर नगरसेवक असतानाही त्यांना ३१ मते मिळाल्याने काँग्रेसचे मते फुटून त्यांना फायदा झाला सही बोलल्या जात आहे. दुसरीकडे अनेक नगरसेवकांचे काँग्रेसचे मते भाजपाच्या कोट्यात गेली आहेत. सकाळपासूनच जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात मतमोजणीला सुरुवात झाली.

### पावसाळी अधिवेशनाचा पहिला दिवस

## विधान भवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांचे आंदोलन...!

प्रतिनिधी २२ जून

**मुंबईः** विधान भवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांनी शेतकरी कर्जमाफीसाठी आंदोलन केले. महाराष्ट्र विधिमंडळाच्या सन २०२६च्या द्वितीय (पावसाळी) अधिवेशनाला आजपासून विधानभवन, मुंबई येथे सुरुवात झाली. पहिल्या दिवसाचे कामकाज 'वंदे मातरम' आणि 'जय जय महाराष्ट्र माझा' या राज्यगीताने सुरू झाले. सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीलाच नुकत्याच निवडून आलेल्या दोन नवनिर्वाचित सदस्यांना विधानसभा अध्यक्षांनी सदस्यत्वाची शपथ दिली. या आमदारांमध्ये बारामती श्रीमती सुनेत्रा अजित पवार आणि राहूरी चे अक्षय शिवाजीराव कर्डिले यांना शपथ दिली. शोक प्रस्तावाकडे वळण्यापूर्वीच विरोधी पक्षातील नेते नाना पटोले यांनी राज्यातील भीषण दुष्काळाचा आणि पाणीटंचाईचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला.

## भीषण अपघातात अकोटच्या दोन युवकांचा मृत्यू

प्रतिनिधी २२ जून

**हातरूण :** उरळ पोलिस स्टेशन अंतर्गत असलेल्या ग्राम अंदुरा पानखास जवळ पुलावर रविवारी दुपारी दुचाकी आणि एसटी बसचा भीषण अपघात झाला. यात अकोट शहरातील दोन युवकांचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना घडली. प्राप्त माहितीनुसार कुणाल राजेश भोरे ३२ व श्रीकांत करुषोत्तम बायस्कर ३० हे दोघे दुचाकी क्र. एमएच ३० बीई ७९७८ ने शेगावहून अकोटकडे येत होते. त्यावेळी अंदुरा पानखास जवळ दुचाकी चालकाचे नियंत्रण







सुटल्याने समोरून येणाऱ्या एसटी बस एमएच १४ एमटी ०२५३ ला धडकली. त्यामुळे दोघेही जागीच ठार झाले. चांदुर बाजार आगाराची बस कोट शेगाव मार्गे छत्रपती संभाजीनगर कडे जात होती. अपघात इतका भीषण होता की कुणाल मोरे आणि हर्षल बायसकर या दोन्ही युवकांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत महत कार्य केले. त्यानंतर उरळ पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविले. उरळ पोलिस तपास करीत आहेत.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा
सोमवार दि. २२ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# राजकारण, संघटना आणि तरुणांचे भविष्य

१८ ते २५ वर्षे हा प्रत्येक तरुणाच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि निर्णायक कालखंड असतो. याच वयात व्यक्ती शिक्षण, करिअर, सामाजिक संबंध, नेतृत्वगुण आणि व्यक्तिमत्त्व विकासाच्या दिशेने वाटचाल करतो. परंतु याच काळात चुकीच्या संगतीमुळे, अविचारी निर्णयांमुळे किंवा दिशाहीनतेमुळे अनेक तरुणांचे आयुष्य भरकटते. काही तरुण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात सकारात्मक योगदान देतात, तर काही व्यसनाधीनता, गुन्हेगारी किंवा इतर गैरप्रकारांच्या विळख्यात अडकतात. महाविद्यालयीन जीवनात किंवा युवक अवस्थेत अनेक तरुण विविध सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय संघटनांशी जोडले जातात. या माध्यमातून नेतृत्वगुण, संवादकौशल्य, समाजसेवेची भावना आणि संघटन कौशल्य विकसित होऊ शकते. मात्र अंधानुकरण, गटबाजी किंवा आक्रमक विचारसरणीचा प्रभाव पडल्यास त्याचे दुष्परिणामी होऊ शकतात.

## 18 ते 25 वर्षांचा प्रवास

मित्रपरिवाराचा प्रभाव, तणाव, उत्सुकता किंवा चुकीची जीवनशैली यांमुळे काही तरुण मद्यपान, तंबाखू, गुटखा, अमली पदार्थ यांसारख्या व्यसनांकडे वळतात. व्यसनामुळे शारीरिक आणि मानसिक आरोग्य बिघडते तसेच शैक्षणिक व व्यावसायिक प्रगतीलाही मोठा फटका बसतो. अनेक युवक स्वयंसेवी संस्था, सामाजिक उपक्रम, पर्यावरण संवर्धन, रक्तदान, आपत्ती व्यवस्थापन अशा क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करतात. अशा तरुणांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येतो आणि त्यांचे व्यक्तिमत्त्वही अधिक सक्षम बनते. काही वेळा राजकीय किंवा सामाजिक गटांमधील वाद, मारामाऱ्या, सोशल मीडियावरील गैरवर्तन किंवा बेकायदेशीर कृत्यांमुळे तरुणांवर गुन्हे दाखल होतात. ज्यांचे गंभीर परिणाम त्यांना तात्काळ जाणवत नाही. गुन्हा दाखल होणे ही केवळ कायदेशीर बाब नसून ती व्यक्तीच्या संपूर्ण भविष्यावर परिणाम करणारी घटना ठरू शकते. शासकीय नोकऱ्या, पोलीस भरती, सैन्य भरती, स्पर्धा परीक्षा, परदेशी शिक्षण किंवा अनेक खाजगी क्षेत्रातील संधी मिळवताना अशा नोंदी अडथळा ठरू शकतात. काही क्षणांच्या चुकीच्या निर्णयाची किंमत अनेक वर्षे मोजावी लागू शकते. याहूनही अधिक वेदनादायक बाब म्हणजे या परिस्थितीचा परिणाम कुटुंबावर होतो. मुलाच्या भविष्याची स्वप्ने पाहणारे आई-वडील मानसिक तणावाखाली जातात. समाजातील चर्चा, न्यायालयीन प्रक्रिया, आर्थिक खर्च आणि मुलाच्या भवितव्याची चिंता यामुळे संपूर्ण कुटुंब अस्वस्थ होते. ज्यांनी आयुष्यभर मुलासाठी कष्ट घेतले, त्यांनाच त्याच्या चुकीच्या निर्णयांचे परिणाम भोगावे लागतात. म्हणूनच तरुणांनी कोणत्याही कृतीत सहभागी होण्यापूर्वी तिचे कायदेशीर, सामाजिक आणि व्यावसायिक परिणाम समजून घेणे आवश्यक आहे. क्षणिक आवेशापेक्षा विवेक, जबाबदारी आणि दूरदृष्टी यांना महत्त्व दिल्यास स्वतःचे करिअर आणि कुटुंबाचा सन्मान दोन्ही जपता येऊ शकतात.

१८ ते २५ वर्षे हे आयुष्याला आकार देणारे वय आहे. या काळात घेतलेले निर्णय, निवडलेली संगत आणि स्वीकारलेली मूल्ये भविष्यातील यश-अपयश निश्चित करतात. सामाजिक व राजकीय क्षेत्रात सहभाग घेणे चुकीचे नाही, परंतु त्यासोबत शिक्षण, करिअर, नैतिकता आणि कायद्याचे भान ठेवणे आवश्यक आहे. तरुणांनी क्षणिक आकर्षणापेक्षा दीर्घकालीन उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित केले, तर ते स्वतःचे आणि समाजाचेही भविष्य उज्ज्वल करू शकतील.

**कु. उर्वशी मनिष संघवी**
रा. मुर्तिजापूर, जि. अकोला

# राजाच्या विरोधात काजींचा निकाल

एकदा हजरत अली हे त्या काळातील खलिफा (राजा) होते. त्यांचे एक सुरक्षा कवच हरवले. काही दिवसांनी त्यांनी ते कवच एका यहुदीकडे पाहिले. हजरत अली यांनी त्याला सांगितले, 'हे कवच माझे आहे.' परंतु यहुदी म्हणाला, 'नाही, हे माझेच आहे.'

वाद वाढल्यावर हजरत अली म्हणाले, 'जर तू माझा दावा मानत नसशील, तर आपण काजींच्या न्यायालयात जाऊ.' दोघेही काजींच्या न्यायालयात गेले. काजींनी हजरत अली यांना पुरावा सादर करण्यास सांगितले. हजरत अली यांनी आपल्या कंबर नावाच्या गुलामाला (नोकराला) साक्षीदार म्हणून हजर केले. त्याने साक्ष दिली की ते सुरक्षा कवच हजरत अली यांचेच आहे. त्यानंतर हजरत अली यांनी आपले दोन पुत्र, हसन व हुसेन, यांनाही साक्षीसाठी हजर केले. त्यांनीही आपल्या वडिलांच्या बाजूने साक्ष दिली. काजी म्हणाले, 'मी तुमच्या नोकराची साक्ष मान्य करतो; परंतु इस्लामी कायद्यानुसार तुमच्या मुलांची साक्ष या प्रकरणात ग्राह्य धरता येणार नाही. त्यामुळे आणखी एक स्वतंत्र साक्षीदार आवश्यक आहे.' हजरत अली दुसरा साक्षीदार सादर करू शकले नाहीत. म्हणून काजींनी इस्लामी शरीयत कायद्यानुसार हजरत अली यांच्या विरोधात निकाल देऊन ते सुरक्षा कवच त्या यहुदीच्या ताब्यात ठेवण्याचा निर्णय दिला. हे पाहून यहुदी आश्चर्यचकित झाला. एका मुस्लिम राजाला न्यायालयात उभे केले गेले आणि न्यायाधीशाने राजाच्या विरोधात निकाल दिला, तरीही राजाने तो शांतपणे स्वीकारला. तेव्हा यहुदीने हजरत अली यांच्याकडे पाहून म्हटले, 'खरे तर हे सुरक्षा कवच तुमचेच आहे. मला ते अमुक ठिकाणी सापडले होते. आता तुम्ही ते परत घ्या. खरोखरच तुमचा धर्म न्यायप्रिय आहे. ज्या धर्मात राजाच्या विरोधातही न्याय दिला जातो, तो धर्म निश्चितच सत्य आहे. मी त्याचा आदर करतो आणि आजपासून इस्लाम धर्म स्वीकारतो.' हजरत अली यांनी ते सुरक्षा कवच आणि आपला घोडाही त्या यहुदीला भेट म्हणून दिला.

**(इद्रीस खान)**
मो. नं. ९४२२१९२९५४

# निरोगी वृद्धत्वासाठी योग

२०२६ च्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाची 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' ही मध्यवर्ती संकल्पना. आपल्याकडे '१०० वर्षांहून अधिक काळ जगले', असा उल्लेख असलेल्या योग्यांची उदाहरणे या ना त्या कारणाने समोर येतात. उदाहरणार्थ योगी चांगदेव, योगी लाहिरी महाशय इत्यादी. आपल्याकडे जुन्या ग्रंथांमध्ये अशी आणखीही उदाहरणे आहेत. वैज्ञानिक दृष्टीने हे शक्य नाही, अशीही सामान्य धारणा असते. या पार्श्वभूमीवर 'निरोगी वृद्धत्वासाठी योग' खरेच कितपत शक्य आहे ? वयोवृद्ध लोक खरोखरच योग करू शकतात का ? या कल्पनेला काही वैज्ञानिक आधार आहे का ?, असे प्रश?न काहींना पडतील. या प्रश?नांची उत्तरे आपण या लेखातून पहाणार आहोत.



### वृद्ध लोक कितपत योग करू शकतात ?

योग करायचे, तर त्यात पुष्कळ आसने करावी लागतात, ती कठीण असतात इत्यादी प्रकारच्या समजुतींमुळे हा प्रश्न असतो. वास्तवात तसे नाही. वय, तसेच व्याधीनुसार करण्यायोग्य अनुरूप आसने उपलब्ध आहेत आणि दुसरे, म्हणजे प्रत्यक्ष नियमितपणे आसने करू लागल्यानंतर स्वतःलाच जे सकृतदर्शनी कठीण वाटत होते, तसे ते कठीण नव्हते, हे स्पष्ट होते. अर्थात् वृद्धांनी योग करतांना तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा. निरोगी वृद्धत्व यांत वृद्धत्वाची लक्षणे न्यूनतम असणे, म्हणजे निरोगीपणा हे अनुस्यूत आहे.

### वृद्धत्वाची लक्षणे

वय वाढते तशी इंद्रियांची क्षमता न्यून होत जाते. त्यामुळे काही लक्षणे दिसू लागतात. उदाहरणार्थ केस गळणे, त्वचेला सुरकुत्या पडणे, विसरणे, पचनक्षमता न्यून होणे, हालचाली मंद होणे, त्या कठीण होणे, पूर्वीसारखे वजन उचलायला न जमणे इत्यादी लक्षणे दिसू लागतात. याचे कारण, म्हणजे संबंधित इंद्रियांच्या मेलेल्या पेशींमुळे झालेली हानी पूर्ववत् भरून निघत नसते. हे अधिक समजण्यासाठी पुढचे सूत्र वाचावे.

### पेशींच्या स्तरावरील वृद्धत्व

मनुष्य देह हा विविध प्रकारच्या कोट्यवधी पेशींनी बनलेला असतो. पेशी जितक्या चांगल्या रितीने कार्यरत असतील, तेवढे त्या त्या इंद्रियाचे कार्य चांगले रहाते. यासाठी बहुतांश इंद्रियांमध्ये जुन्या पेशी मृत होऊन त्यांची जागा त्याच प्रकारच्या नवीन पेशींनी घेणे, ही प्रक्रिया अव्याहत चालू असते. उदाहरणार्थ तरुणपणामध्ये प्रत्येक २ ते ४ आठवड्यांनी (अनुमाने १४ ते २८ दिवस) त्वचेच्या पेशी पूर्णपणे पालटल्या जातात. प्रत्येक १ आठवड्यापेक्षाही न्यून वेळात (अनुमाने ३ ते ५ दिवसांत) पचनसंस्थेच्या (विशेषतः लहान आणि मोठ्या आतड्याच्या) आतील आवरणाच्या पेशी पूर्णपणे पालटल्या जातात. प्रत्येक पेशी ५० ते ७० वेळा विभाजित होऊ शकत असते. जीवनात होत असलेले मधुमेहादी विविध प्रकारचे आजार, धूम्रपान, तंबाखू आदी चुकीच्या सवयी आणि मानसिक तणाव, अशा विविध कारणांमुळे देहावर ताण येत असतो.

हा ताण 'डी.एन्.ए.'च्या कार्यावर परिणाम करतो. 'डी.एन्.ए.' नादुरुस्त झाला की, पेशी मरतात. मग त्या इंद्रियांची क्षमता न्यून होते. यातून जुन्या पेशींची जागा घेणाऱ्या नवीन पेशी उत्तम रितीने सिद्ध होत रहाणे किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात येईल. वृद्धत्वामध्ये नवीन पेशी सिद्ध होणे, ही प्रक्रिया हळू होत जाते. हे का होते ?

देहली येथील 'अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान' (एम्स) येथे वर्ष २०१७ मध्ये ९६ व्यक्तींवर सलग १२ आठवडे प्रयोग करण्यात आले. या व्यक्तींनी प्रतिदिन नियमितपणे प्रार्थना, 'वॉर्मअप' (प्रारंभीचे व्यायाम), विविध योगासने, प्राणायाम, ध्यान, ओंकार ध्वनी आणि शांतीमंत्र असे ठरवून दिलेले सत्र केले.

संशोधनातून स्पष्ट झालेले परिणाम : या प्रयोगातून नियमित योग केल्यास मानवी शरिराला विविध प्रकारे लाभ होतात आणि त्यातून 'निरोगी वृद्धत्वाकडे जायची गुरुकिल्ली - योग' हे दिसून आले.

अ. 'अमरत्व रसायनात' वाढ : प्रयोगात सहभागी व्यक्तींच्या रक्तातील 'टेलोमरेझ' (ऊत्दर्सी) 'एन्झाईम'ची पातळी लक्षणीयरित्या वाढली. या वाढलेल्या 'टेलोमरेझ'ने 'टेलोमियर्स'ची डागडुजी तत्परतेने केली आणि त्यांची लांबी सुरक्षित ठेवली, म्हणजेच योगाने शरिराचे जैविक घड्याळ एकप्रकारे उलट फिरवण्यासारखे (र्निर्गुग्हु) काम पेशींच्या पातळीवर केले.

आ. अन्य रसायनांतील लाभकारी पालट : जीवनातील ताणामुळे शरिरात सिद्ध होणाऱ्या पेशींची हानी करणाऱ्या रसायनांत घट झाली. मेंदूला प्राणवायूचा पुरवठा वाढला. मेंदूतील रक्तवाहिन्या निरोगी राखण्यात साहाय्य झाले. मेंदूच्या पेशींच्या आरोग्यासाठी आवश्यक रसायनांमध्ये (हे जणू मेंदूच्या पेशींसाठी खत असते) वाढ झाली. जैविक घड्याळ आणि अमरत्वाचे रसायन पेशींमध्ये गुणसूत्रे (क्रोमोसोम) असतात. त्यांच्यावर त्या त्या पेशीचे कार्य अवलंबून असते. प्रत्येक गुणसूत्रामध्ये 'डी.एन्.ए.' असतात. एका पेशीपासून नवीन पेशी सिद्ध होणे, यासाठी माता पेशीतील गुणसूत्रांतील 'डी.एन्.ए.'ची प्रत कन्या पेशीमध्ये जशीच्या तशी सिद्ध केली जात असते. 'डी.एन्.ए.'वर कोणताही आघात होऊ नये, यासाठी गुणसूत्रांच्या चारही टोकांना ४ संरक्षक टोप्या असतात. ज्यांना 'टेलोमियर्स' म्हणतात. नवीन पेशीसाठी 'डी.एन्.ए.'ची नवीन प्रत सिद्ध होतांना या 'टेलोमियर्स'ची हानी होऊन ती आखूड बनत जातात. 'टेलोमियर्स'ची दुरुस्ती करून त्यांना पूर्ववत् करायचे कार्य 'टेलोमरेज' नावाचे रसायन करत असते. हे आपल्या शरिरात नैसर्गिकरित्या सिद्ध होते. जर रक्तातील 'टेलोमरेझ'ची मात्रा चांगली असेल, तर 'टेलोमियर्स' लहान होण्याचा वेग मंदावतो. परिणामी नवीन पेशी सहज सिद्ध होऊन त्या दीर्घकाळ कार्यरत रहातात. सामान्यतः वयानुसार शरिरातील 'टेलोमरेझ एन्झाईम'चे प्रमाण न्यून होत जाते आणि त्यामुळे स्वाभाविक 'टेलोमियर्स'ची दुरुस्ती प्रक्रिया अकार्यक्षम बनत ती आखूड होत जातात. एका मर्यादेच्या पुढे 'टेलोमियर्स' आखूड झाल्यानंतर त्या पेशीची नवीन पेशी निर्माण करायची क्षमता संपते. ती पेशीही मरून जाते. मग पुढील दुष्टचक्र गती घेते. इंद्रिये वेगाने अकार्यक्षम बनत जातात. थोडक्यात 'टेलोमियर्स' हे गुणसूत्रांचे आयुष्य मोजणारे जैविक घड्याळ, तर 'टेलोमरेझ' त्या घड्याळाची झीज रोखणारी चावी (अमरत्वाचे रसायन) आहे ! योगामुळे नेमक्या याच प्रक्रियेवर सकारात्मक प्रभाव पडतो. टेलोमियर्सनी (पांढरे) टोके झाकलेली मानवी गुणसूत्रे (राखाडी)

### निष्कर्ष

वृद्धत्वामध्ये होणारी मेंदू आणि शरीर यांची झीज नैसर्गिक असली, तरी योग हा ती झीज रोखणारा अन् शरिराला गुणसूत्रांच्या पातळीवर तरुण ठेवणारा एक प्रभावी वैज्ञानिक मार्ग आहे. योग प्रत्येकाने करावा, जो करील त्याने तो नियमितपणे करावयासाठी हा लेखन प्रपंच ! त्यामुळे तरुणांनी वृद्धत्व शक्य तितके पुढे ढकलण्यासाठी आणि वृद्धांनी वय वाढले असूनही क्षमता शक्य तितकी राखण्यासाठी अर्थात् निरोगीपणासाठी तरी योग नियमित करावा. यामुळे मानवी जीवनाचे ध्येय, म्हणजे स्वतःची आध्यात्मिक उन्नती करणे, हे योगाचे मूळ उद्दिष्ट साध्य करणे अधिक सोपे बनते; मग त्यासाठीही प्रयत्न करावेत.'

**डॉ. दुर्गेश सामंत, गोवा**

# पर्यावरण संरक्षण: काळाची गरज


'वसुधैव कुटुम्बकम' आणि निसर्गाला देव मानणारी आपली संस्कृती आहे. परंतु, आजच्या आधुनिक आणि औद्योगिक युगात मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी निसर्गाचा मोठ्या प्रमाणावर ओरबाडा केला आहे. आज प्रदूषण, जागतिक तापमानवाढ आणि ऋतूचक्राचा बिघाड यांसारख्या गंभीर समस्या आपल्यासमोर उभ्या ठाकल्या आहेत. म्हणूनच, पर्यावरण संरक्षण ही आज केवळ एक घोषणा नसून ती आपल्या अस्तित्वाची लढाई झाली आहे.

**पर्यावरण ऱ्हासाची मुख्य कारणे**

आपल्या पर्यावरणाचा समतोल बिघडण्यामागे प्रामुख्याने मानवी हस्तक्षेप कारणीभूत आहे :

सिमेंटची जंगले उभारण्यासाठी आणि औद्योगिकीकरणासाठी लाखो झाडे दररोज तोडली जात आहेत.

कारखाने आणि वाहनांमधून निघणारा धूर, रासायनिक सांडपाणी यामुळे हवा, जल आणि भूमी प्रदूषणाचा भस्मासूर वाढला आहे. विघटन न होणाऱ्या प्लॅस्टिकमुळे कचऱ्याचे ढीग साचत असून जलचर आणि प्राण्यांचे जीवन धोक्यात आले आहे.



नैसर्गिक संसाधनांचा अतिवापर: पाणी, खनिज तेल आणि कोळसा यांसारख्या मर्यादित संसाधनांचा अनिर्बंध वापर केला जात आहे.

पर्यावरण वाचवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात छोटे छोटे बदल करणे गरजेचे आहे. 'थेंबे थेंबे तळे साचे' या उक्तीप्रमाणे आपले छोटेसे पाऊलही मोठे परिवर्तन घडवून आणू शकते. वृक्षारोपण प्रत्येक व्यक्तीने वर्षाला किमान एक झाड लावून ते जगवले पाहिजे. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून आपल्याला ऑक्सिजन देतात.

पाण्याची बचत पाण्याचा अपव्यय टाळणे, रेन वॉटर हार्वेस्टिंग (जमीनदोस्त पाणी साठवण) पद्धत वापरणे. प्लॅस्टिक बंदी प्लॅस्टिक पिशव्यांऐवजी कापडी किंवा ज्यूटच्या पिशव्यांचा वापर करणे.

ऊर्जा बचत गरज नसताना दिवे-पंखे बंद करणे, प्रवासासाठी सार्वजनिक वाहनांचा किंवा सायकलचा वापर करणे. पर्यावरण रक्षणासाठी नियम पाळणे अत्यंत आवश्यक आहे:


कचरा निर्माण करणाऱ्या वस्तूंचा वापर कमी करणे. एकाच वस्तूचा वेगवेगळ्या कामांसाठी पुन्हा पुन्हा वापर करणे. जुन्या कचऱ्यापासून (उदा. कागद, काच, प्लास्टिक) नवीन वस्तू तयार करणे.

'निसर्ग माणसाची गरज पूर्ण करू शकतो, पण त्याचा हावरेपणा नाही.' - महात्मा गांधी

निसर्ग आहे तर आपण आहोत, हे मानवाने आता समजून घेण्याची वेळ आली आहे. येणाऱ्या पिढीला जर आपल्याला शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि निरोगी आयुष्य द्यायचे असेल, तर आजच पर्यावरण संरक्षणाची शपथ घ्यावी लागेल. ५ जून हा 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून फक्त एक दिवस साजरा न करता, वर्षाचे ३६५ दिवस आपण निसर्गाशी कृतज्ञ राहून वागले पाहिजे.

## दिन विशेष

# जागतिक पर्जन्यवन दिन



जागतिक पर्जन्यवन दिन महत्त्वाचा आणि संवर्धनाचा संदेश देणारा हा दिवस आहे. जागतिक पर्जन्यवन दिन दरवर्षी २२ जून रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश पृथ्वीवरील पर्जन्यवनांचे (Rainforests) महत्त्व, त्यांची जैवविविधता आणि हवामानाचा समतोल राखण्यात त्यांची असलेली महत्त्वाची भूमिका याबद्दल लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा आहे.

**इतिहास आणि सुरुवात**

या दिवसाची सुरुवात वर्ष २०१७ मध्ये 'रेनफॉरेस्ट पार्टनरशिप' (Rainforest Partnership) नावाच्या आंतरराष्ट्रीय बिगर-नफा (Non-profit) संस्थेद्वारे करण्यात आली होती. हवामान बदलाच्या गंभीर आव्हानांच्या काळात, उष्णकटिबंधीय पर्जन्यवनांचे रक्षण, संवर्धन आणि त्यांच्या पुनर्वाढ/पुनर्विकासासाठी लोक आणि संस्थांना एकत्र आणणे हे या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

**पर्जन्यवने का महत्त्वाची आहेत?**

**हवामानाचा समतोल :** पर्जन्यवने मोठ्या प्रमाणावर कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ग्रीनहाऊस वायूंचा (Greenhouse gases) प्रभाव कमी करतात.

**जैवविविधता :** पृथ्वीवर आढळणाऱ्या वनस्पती आणि प्राण्यांच्या एकूण प्रजातींपैकी निम्म्याहून अधिक प्रजाती केवळ याच पर्जन्यवनांमध्ये राहतात.

**ऑक्सिजन आणि पाणी :** एकट्या ॲमेझॉनच्या पर्जन्यवनांमधून जगातील सुमारे २० टक्के ऑक्सिजनची निर्मिती होते.

**भारतातील महत्त्व :** भारतातील पर्जन्यवने (जसे की पश्चिम घाटातील जंगले) बाष्पोत्सर्जनाच्या (Evapotranspiration) माध्यमातून मान्सूनला गती व ऊर्जा देतात.

**सद्यसमोरील आव्हाने**

बेकायदेशीर जंगलतोड, शेतीचा विस्तार आणि अनिर्बंध विकास यांमुळे दर मिनिटाला सुमारे ४० फुटबॉल मैदानांच्या आकाराएवढी पर्जन्यवने नष्ट होत आहेत.

जागतिक पर्जन्यवन दिन आपल्याला आठवण करून देतो की, या परिसंस्थेचे (Ecosystem) रक्षण करणे केवळ निसर्गासाठीच नाही, तर मानवी अस्तित्वासाठीही अत्यंत आवश्यक आहे. पर्जन्यवनांचे महत्त्व, त्याचे संवर्धन आणि या दिवसाचे मूलभूत पैलू थोडक्यात समजून घेण्यासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा आहे.

# माणुसकीचा वसा : डॉ. भास्करराव मुळे

तेल्हाऱ्याचे सुप्रसिद्ध आणि सुहृद डॉक्टर भास्करराव मुळे यांनी या जगाचा निरोप घेतला. गेल्या एक-दोन वर्षांपासून आजारपणामुळे ते मुंबईला आपल्या मुलाकडे राहत होते. त्यांच्या अंतिम इच्छेनुसार त्यांच्या पार्थिवावर मूळ गावी, म्हणजेच तेल्हाऱ्यालाच अंत्यसंस्कार करण्यात आले. 'आपल्या मातीतच मला शेवटचा श्वास घेऊ द्या किंवा मी गेल्यानंतर तरी माझे अंत्यविधी तिथेच करा,' हा त्यांचा ध्यास अखेर पूर्ण झाला. आपली कर्मभूमी आणि तिथल्या माणसांशी असलेले त्यांचे नाते किती घट्ट होते, याचीच ही प्रचिती.

मुंबईला हितेशच्या आलिशान फ्लॅटमध्ये बसले असताना, शेवटच्या दिवसांत त्यांच्या तोंडी वारंवार एकच वाक्य असायचे की, मला एकदा तेल्हारा बघून येऊ द्या. खिडकीबाहेर उंचच उंच इमारती आणि खाली धावणारी गर्दी दिसायची; पण डॉक्टरसाहेबांच्या डोळ्यांत मात्र तेल्हाऱ्याचा तो धुळीचा रस्ता, दोन खोल्यांचा साधा दवाखाना आणि ओसरीवर बसलेली माणसं रूंजी घालत असायची. 'डॉक्टरसाहेब, जरा ऐका नाष्ठ' म्हणत मन मोकळं करणारे चेहरे त्यांना सारखे साद घालत होते. माणसाने या जगाचा निरोप घेण्याआधी एकदा तरी तिथं परत जावं, जिथं आपल्या हातून एखादा हात निसटला, एखादा क्षण साठला आणि एखादं आयुष्य उभं राहिलं. आज डॉक्टरसाहेब आपल्यात नसले तरी त्यांचा हा संपूर्ण प्रवास डोळ्यांसमोर उभा राहतोय.

तेल्हारा डॉक्टरसाहेबांची खऱ्या अर्थाने कर्मभूमी होती. साध्या दोन खोल्यांतून सुरू झालेली त्यांची प्रॅक्टिस पैशांपेक्षा विश्वासाच्या कमाईवर चालली. फी कमी आणि माणुसकी जास्त, हेच त्यांचे ब्रीद होते. कुणी शेतकरी, मजूर तर कुणी गरजू महिलाष्ठ 'डॉक्टर, तुमच्याशी बोललो की बरं वाटतं,' असे म्हणत लोक हक्काने त्यांच्याकडे यायचे. ते कधीही पैशांचा हट्ट धरत नसत. ते उपचार फक्त औषधांनी करत नव्हते, तर रुग्णाचे ऐकून, त्याला समजून घेऊन आणि मायेने हात धरून करत होते. त्यांनी आयुष्यभर फक्त रुग्ण नाही, तर माणसं कमावली. उपचार शरीरापेक्षा मनावर जास्त करायचे असतात, हे ओळखणारे ते उत्तम मानसशास्त्रज्ञ होते. कुणाच्या डोळ्यांत पाणी दिसले, तर कारण न विचारता फक्त त्याचा हात हातात घेऊन धीर देणे, ही त्यांची उपचारपद्धती होती.

सोनखाससारख्या छोट्याशा खेड्यात, ग्रामीण मातीत वाढलेल्या डॉक्टरसाहेबांनी कष्ट, संवेदना आणि सामान्य माणसाचे दुःख अगदी जवळून पाहिले. दहावीपर्यंतचे शिक्षण गावाकडे पूर्ण करून त्यांनी अकोल्याच्या राधाकिसन तोष्णीवाल आयुर्वेदिक महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण घेतले. शिक्षणानंतर भांबेरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांनी सेवेला प्रारंभ केला पण नोकरीपेक्षा थेट समाजात उतरून माणसांसाठी जगणे, हा त्यांचा खरा स्वभाव होता म्हणूनच नोकरीचा राजीनामा देऊन त्यांनी स्वतंत्र वैद्यकीय सेवा सुरू केली.

तेल्हाऱ्याला रसिक मित्र मंडळाची स्थापना करण्यात त्यांनी पुढाकार घेतला आणि विविध कार्यक्रमांची मेजवानी तेल्हारावासियांना दिली. यामध्ये प्रामुख्याने पंडित भीमसेन जोशी यांना तेल्हारा सारख्या छोट्या गावी आणून त्यांचा लाईव्ह कार्यक्रम घेण्यामध्ये डॉक्टरसाहेबांचा सिंहाचा वाटा आहे. विविध शाळा महाविद्यालयांमध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर आणि मार्गदर्शनपर अनेक भाषणे दिली. जेसिस क्लब ऑफ इंडिया तेल्हाऱ्यात स्थापन करून त्यांनी अनेक समाजोपयोगी उपक्रम आयोजित केले.

गुरुदेव सेवा मंडळाची स्थापना तेल्हारा येथे करून त्यांचे राहत्या घरी दर गुरुवारी राष्ट्रसंतांची प्रार्थना आणि भजने ते आयोजित करीत असत. वैद्यकीय सेवा करीत असतानाच राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार तेल्हारा आणि आजूबाजूच्या पंचक्रोशीत करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.

तेल्हारा येथे पहिले रेसिडेन्शिअल लेआउट डॉक्टर साहेबांनीच वसविले आहे. कमर्शियल लेआउट टाकून बक्कळ पैसा कमावण्यापेक्षा गरजू व्यक्तींना माफक दरात घरे उपलब्ध व्हावीत हा त्या मागचा उद्देश होता. त्यांच्या या धाडसी निर्णयामुळेच त्यानंतर तेल्हारा येथे प्लान्ड लेआउट्स सुरू झाले. पैशाचा हव्यास न करता त्यांनी अनेक गरजूंना अत्यंत माफक दरात हे प्लॉट्स उपलब्ध करून दिले.

तेल्हारासारख्या गावातून अनेक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाकडे वळविण्यात त्याचप्रमाणे स्किल्ड कोर्सेस पूर्ण करून व्यावसायिक क्षेत्रात उतरवण्यासाठी त्यांनी शेकडो विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

काळ बदलला आणि आजाराने ग्रासल्यामुळे त्यांना मुंबईला मुलाकडे आणले गेले. मुलगा आणि सून दोघांनीही त्यांची खूप काळजी घेतली. तिथेही त्यांनी आपल्या स्वभावाने माणसे जोडली. त्यांच्या याच ओढीमुळे मुलाने फ्लॅटच्या परिसरात त्यांना एक छोटा दवाखाना थाटून दिला होता. तो उपचारासाठी नव्हता, तर संवादासाठी होता. तिथे आजूबाजूची माणसे यायची, मन मोकळे करायची आणि केवळ मन मोकळे करण्याची फी द्यायची. किती विलक्षण गोष्ट आहे ही! डॉक्टरसाहेब समोरच्याचे दुःख ऐकण्यासाठी आपले मन आणि हृदय सदैव उघडे ठेवायचे.



त्यांचा मुलगा डॉ.हितेश आणि सून डॉ.नेहा मुंबईत डॉक्टर आहेत.मोठी मुलगी डॉ.वैशाली इंग्रजीत पीएच.डी.आहे व जावई डॉ. मनीष गायकवाड शिवाजी सायन्स कॉलेज येथे प्रोफेसर आहे. लहान मुलगी डॉ. निकिता नागपूरला नेत्रतज्ञ आहे व जावई डॉ. मनोज व्यवहारे हे पोट विकार तज्ञ आहेत ..त्यांच्या पत्नी रजनीताई मुळे तेल्हाऱ्याला नगराध्यक्ष होत्या. डॉक्टरसाहेबांनी नेहमीच त्यांच्या पंखांना आकाश दिले आणि कुटुंबातील प्रत्येकाला स्वतःची स्पेस दिली.

आज समाजात असं अजातशत्रू व्यक्तिमत्त्व दुर्मिळ असलं, तरी त्यांनी जपलेला माणुसकीचा हा वसा आणि वारसा पुढे चालत राहणे, हीच त्यांना खरी भावपूर्ण श्रद्धांजली!

**डॉक्टर साहेबांच्या पवित्र स्मृतींना आणि माणुसकीला विनम्र अभिवादन!**

**डॉ.लीना निकम, नागपूर**

# साहित्यिक, लेखकांना आवाहन

**दैनिक सिटी न्यूज सुपरफास्ट** आता आठ पानांसह वाचकांना उपलब्ध होत आहे. अंकातील विविधा पानासाठी अकोला शहर तसेच जिल्ह्यातील साहित्यिक, लेखक, कवी यांनी त्यांचा मजकूर **८३९०६७०९९९** या **व्हॉटसअप** क्रमांकावर पाठवावा.

त्याला यथायोग्य प्रसिद्धी दिली जाईल. या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २२ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com



# प्रमाणपत्रांसाठी सेतू केंद्रावर मोठी गर्दी, दलाल ही सक्रिय

प्रतिनिधी २२ जून

**अकोला:** इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर उच्च शिक्षणाच्या प्रवेशासाठी आवश्यक प्रमाणपत्रांकरिता विद्यार्थी आणि पालक सेतू सुविधा केंद्रांवर गर्दी करत आहेत प्रवेशासाठी होणारी गर्दी आणि सेतू केंद्रांवरील लांब लांब रांगांमुळे विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे या प्रक्रियेत दलाल हस्तक्षेप करत असल्याच्या तक्रारीही येत आहेत काही ठिकाणी जास्त शुल्क आकारले जात असून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी जात प्रमाणपत्र उत्पन्नाचा दाखला आणि रहिवासी दाखला यासारखी कागदपत्रे अनिवार्य आहेत या प्रमाणपत्रांसाठी सध्या जिल्ह्यातील सेतू केंद्रात बाहेर लांबच लांब रांगा दिसत आहेत जिल्ह्यात तीनशेहून अधिक मान्यताप्राप्त आपले सरकार केंद्रे असूनही

### ♦ तासनतास रांगेत उभे राहण्याची वेळ



**प्रमाणपत्राचे प्रकार**

| | जुने दर | नवे दर |
|---|---|---|
| जात प्रमाणपत्र | ५८ | १२८ |
| नॉन क्रिमीलेअर | ५८ | १२८ |
| अधिवास प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| उत्पन्न प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| शपथ पत्र ३४ | ६९ | |
| महिला आरक्षण | ३४ | ६९ |
| शेतकरी प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| भूमिहीन प्रमाणपत्र | ३४ | ६९ |
| श्रावण बाळ योजना | ३४ | ६९ |

वाढत्या मागणीमुळे केंद्रांवर मोठा दबाव निर्माण होत आहे पालकांना अनेकदा केंद्रांवर तासनतास थांबावे लागत आहे रांगेत उभे राहूनही काम पूर्ण होत नाही कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तहसील कार्यालय शाळा आणि सेतू केंद्र यांच्यामध्ये विद्यार्थ्यांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत आहेत

# गायगाव व भौरदवासीय झाले श्रीचरणी नतमस्तक

### ♦ राजराजेश्वर नगरीत उद्या श्री संत गजानन महाराज पालखीचे जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** आषाढी एकादशी यात्रा महोत्सवात सहभागी होण्यासाठी टाळ-मृदंगाच्या निनादात, पारंपरिक वाद्यांच्या गजरात तसेच भगवतधर्माच्या पताका हातात घेऊन सुमारे ७०० हून अधिक वारकऱ्यांसह निघालेल्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे अकोला जिल्ह्यात उत्साहात स्वागत होत आहे. रविवारी सायंकाळी पालखीचे पारस येथे आगमन झाल्यानंतर परिसरातील भाविकांनी रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी गर्दी केली.

सोमवारी पहाटे ५ वाजता श्रींचा अभिषेक व पूजन विधी संपन्न झाल्यानंतर पालखी गायगावच्या दिशेने मार्गस्थ झाली. निमकर्दा मार्गे सकाळी ९ वाजता पालखी गायगाव येथील प्राचीन गणेश मंदिर परिसरात दाखल झाली. यावेळी ग्रामस्थांनी पालखीचे भक्तिभावाने स्वागत करून वारकऱ्यांचे आदरातिथ्य केले. दुपारी १२ वाजता पालखीने गावातून भ्रमण करत विश्रांती घेतली.

यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी श्रींचे दर्शन घेऊन आराधना केली.त्यानंतर पालखी भौरदकडे रवाना झाली. मार्गात विविध ठिकाणी ग्रामस्थांनी लिंबू सरबत, ताक, मठ्ठा तसेच इतर अल्पोपहाराचे वाटप करून पालखीचे स्वागत केले. सायंकाळी पालखीचा मुक्काम भौरद येथे होणार आहे. दरम्यान, मंगळवारी सकाळी सुमारे ७ वाजता श्री संत गजानन महाराजांची पालखी राजराजेश्वर नगरी अकोल्यात दाखल होणार आहे. अनोखा हनुमान मंदिराजवळ अकोला वारकरी संप्रदायाच्या वतीने पालखीचे भव्य स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर पालखी डाबकी रोडवरील खंडेलवाल विद्यालय येथे विश्रांतीसाठी थांबणार असून भाविकांना श्रींच्या दर्शनाचा लाभ घेता येणार आहे. पालखी मार्गावरील प्रत्येक गावात होत असलेले उत्स्फूर्त स्वागत, भक्तिभावाने केली जाणारी सेवा आणि वारकऱ्यांचा अखंड हरिनामाचा गजर यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.


# बेरोजगार फसवणूक प्रकरणात मोठे मासे गळाला लागणार !

प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ येथे कायमस्वरूपी नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवत अकोला आणि जळगाव खान्देशातील अनेक बेरोजगार युवक-युवतींकडून कोट्यवधी रुपये उकळणाऱ्या रॅकेटचे धक्कादायक धागेदोरे समोर येत असून, या प्रकरणात आणखी काही मोठे मासे गळाला लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाचा तपास करणाऱ्या जुने शहर पोलिसांच्या कारवाईकडे अन्यायग्रस्तांचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी स्वाती स्वप्निल जुनगडे (इंगळे) हिला अकोला पोलिसांनी जळगाव न्यायालयातून ताब्यात घेतले असून, चौकशीदरम्यान अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. सरकारी नोकरीच्या नावाखाली बनावट नियुक्तिपत्रे, मुलाखतीची पत्रे, ओळखपत्रे ताब्यात घेतले. याप्रकरणी जुने शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४) व ३३६ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, प्राथमिक तपासात अकोला आणि जळगावसह खान्देशातील अनेक युवक-युवतींची लाखो रुपयांनी फसवणूक झाल्याचे धागेदोरे समोर येत असल्याने हा घोटाळा कोट्यवधींचा असल्याची चर्चा रंगली आहे. तक्रारदार श्रीकांत बाबुराव सरदार (४०) रा. वाशीम बायपास परिसर, अकोला यांच्या पत्नीची ओळख गांधी रोडवरील एका ब्युटी पार्लरमधून स्वाती जुनगडे हिच्याशी झाली होती. स्वतःचे उच्चस्तरीय संपर्क असल्याचा आव आणत तिने पीकेव्हीमध्ये लिपिक पदावर कायमस्वरूपी नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. विश्वास संपादन करत मूळ कागदपत्रांसह टप्प्याटप्प्याने लाखो रुपयांची मागणी करण्यात आली. मार्च २०२५ पासून बँक व्यवहार, आरटीजीएस आणि फोन-पेच्या माध्यमातून गोठी रक्कम स्वीकारण्यात आली. एवढेच नव्हे तर पीकेव्हीच्या नावाने बनावट नियुक्ती आदेश, कथित मुलाखतपत्र, ओळखपत्र तसेच सेवा पुस्तिका तयार करून अधिकृत प्रक्रियेचा भास निर्माण करण्यात आला होता. नियुक्तिपत्रे, सेवा पुस्तिका आणि इतर दस्तावेज तयार करण्यामागे आणखी कोणाचा हात आहे? सरकारी कार्यालयांतील काही व्यक्तींचे पाठबळ होते का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. तपासाची व्याप्ती वाढत असून, आगामी काळात या प्रकरणात आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वैद्यकीय तपासणी, अंतिम मुलाखत आणि आचारसंहितेचे कारण पुढे करत नियुक्ती प्रक्रिया वारंवार लांबविण्यात आली. अखेर पीडितांनी थेट पीकेव्ही प्रशासनाकडे चौकशी केली असता, सर्व कागदपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट झाले आणि फसवणुकीचा भंडाफोड झाला. हे प्रकरण आणखी कोणावर शेकणार याकडे लक्ष आहे.

# राजपूतपुरा भागातील मोठ्या नाल्याची स्वच्छता आता सुरू

### ♦ नाल्यातील कचरा बाजूलाच टाकल्यामुळे अस्वच्छता



प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** पावसाला उशीर झाला म्हणून बरे नाही तर शहरातील नाल्यांची स्वच्छता तशीच राहिली असती. राजपूतपुरा आणि देवरावबाबा चाळीच्या मधून वाहणाऱ्या मोठ्या नाल्याची स्वच्छता आज सकाळ पासून सुरू केली आहे. गेली कित्येक वर्षे याकडे लक्ष नाही. आजुबाजूला झाडे वाढली. त्यामुळे रहिवाशांची गैरसोय होत आहे.

पावसाळ्यापूर्वी नाले, नाल्यांची स्वच्छता करण्यात यावी अशी मागणी होती. मात्र आता जून संपत आला तरी नाले सफाई सुरू आहे. तसेच स्वच्छता कामे देखील व्यवस्थित होत नाही अशी ओरड होत आहे. नाल्यांमधील कचरा तिथेच टाकला जातो. वेळीच कचरा उचलला नाही तर रस्त्यावर घाण पसरते. तसेच आजुबाजूच्या लोकांना त्याचा त्रास होतो. त्यामुळे एकावेळी व्यवस्थित कामे करावी अशी मागणी आहे.

# विदर्भ माध्यमिक शिक्षक संघातर्फे गुरुवारी धरणे व निदर्शने आंदोलन

प्रतिनिधी २२ जून

**यवतमाळ :** राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने पावसाळी अधिवेशनादरम्यान संघटनेचे सरकार्यवाह तथा आमदार श्री. सुधाकर अडबाले व माजी आमदार व्हि. यू. डायगव्हाणे यांच्या नेतृत्वात गुरुवार, दि. २५ जून २०२६ रोजी दुपारी ३ ते ५ वाजेपर्यंत विभागीय शिक्षण उपसंचालक (नागपूर/ अमरावती) कार्यालयासमोर व विदर्भातील सर्व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर धरणे व निदर्शने आंदोलन करण्यात येणार आहे. राज्यातील खाजगी, स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, खाजगी अनुदानित शाळा, विजाभज तसेच आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष द्यावे, या मागणीसाठी हे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. या आंदोलनात राज्यातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व राज्य कर्मचाऱ्यांना सरसकट जुनी पेन्शन योजना लागू करणे, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त परंतु नंतर १०० टक्के अनुदान मिळालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना देणे, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदभरतीवरील बंदी उठविणे, शिक्षकांची रिक्त पदे तात्काळ भरणे, शाळांना सातव्या वेतन आयोगावर आधारित १०० टक्के वेतनेत्तर अनुदान देणे, तसेच शिक्षकांना १०-२०-३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करणे अशा प्रमुख मागण्या करण्यात येणार आहेत. याशिवाय नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षक व कर्मचाऱ्यांना १५ञ नक्षल ग्रस्त भत्ता देणे, अंशतः अनुदानित शाळांमधील कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा व इतर सेवा लाभ देणे, विद्यार्थ्यांच्या हितासाठी २० पटाखालील शाळा बंद न करण्याची मागणी, तसेच शिक्षकांचे निवृत्ती वय ६० वर्षे करणे, संगीत शिक्षकांच्या मागण्या मंजूर करणे तसेच शिक्षण क्षेत्राशी संबंधित एकूण ४० मागण्यांना घेऊन आंदोलन करण्यात येणार आहे.या आंदोलनात विदर्भातील सर्व जिल्ह्यांतील संघटनेचे प्रांतीय पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, जिल्हा कार्यवाह तसेच शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आव्हान विमाशी संघटनेचे प्रांतीय अध्यक्ष अरविंद देशमुख, अमरावती शिक्षक मतदार संघाचे अधिकृत उमेदवार दिलीप कडू, प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, जयप्रकाश थोटे, जयकुमार सोनखासकर, विजय ठोकळ, विभागीय कार्यवाह चंद्रशेखर रहांगडाले, बाळासाहेब गोटे, कोषाध्यक्ष भूषण तल्हार तसेच जिल्हा, महानगर, तालुका पदाधिकारी यांनी केले आहे.

# अनिता मेश्राम यांना निरोप ; अनय नावंदर यांचे स्वागत

प्रतिनिधी २२ जून



**अकोला :** जिल्हा परिषदेच्या संविधान भवनात सायंकाळी भावनांनी ओथंबलेला आणि उत्साहाने भारलेला अविस्मरणीय सोहळा पार पडला. एका बाजूला संवेदनशील मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम यांना निरोप तर नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांचे जिल्हा परिषदेत आगमन होताच नगारांच्या गजराने, टाळ्यांच्या कडकडाटाने परिसर दुमदुमून गेला. संविधान भवन परिसर आकर्षक रोषणाई व फुग्यांच्या सजावटीने सजला होता. निरोप समारंभात वक्त्यांनी अनिता मेश्राम यांच्या कार्यकाळाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. त्यांची आयुक्त, मनरेगा नागपूर या महत्त्वपूर्ण पदावर नियुक्ती झाल्याने उपस्थितांनी त्यांचे अभिनंदन केले. अकोला जिल्हा परिषद माझ्यासाठी केवळ कार्यालय नव्हते. येथील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक माझ्या कुटुंबाचा भाग बनला. अकोल्याच्या मातीने मला खूप काही दिले आहे. येथे मिळालेला स्नेह आणि विश्वास मी आयुष्यभर जपून ठेवेन असे अनिता मेश्राम म्हणाल्या. अनय नावंदर यांनी जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दिगंबर लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन रविदास भोयर यांनी केले.

# अकोट फाईल मध्ये अण्णाभाऊ साठे परिसरात दोन गटात दगडफेक





### ♦ परिसरात तणावपूर्ण शांतता

प्रतिनिधी २२ जून

**अकोला :** अकोट फाईल मध्ये दानिश आणि विशाल यांच्यात आज संध्याकाळच्या सुमारास कबुतर उडवण्यावरून वाद झाला होता. रात्री ११:०० वाजताच्या सुमारास दोन्ही गटात पुन्हा एकदा वाद झाला. यावेळी दोन्ही बाजूंकडून एकमेकांवर जोरदार दगडफेक करण्यात आली, ज्यामुळे परिसरात काही काळ प्रचंड तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही गटातील आठ जणांना अटक केल्याचे कळते. वरिष्ठ पोलीस अधिकारी, आरसीपीचे जवान आणि शहरातील सर्व ठाणेदार घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. दगडफेक करणाऱ्या काही जणांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सध्याची परिस्थिती पाहता परिसरात चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, परिसरात सध्या तणावपूर्ण शांतता आहे असे शहर एसडीपीओ सुदर्शन पाटील यांनी सांगितले.

# मंजूर रस्त्यावर अतिक्रमण : फ्रीडम शाळेला नगरपरिषदेचे बांधकाम हटविण्याची नोटीस

वि. प्रतिनिधी २२ जून

**अकोट :** अकोट नगरपरिषदेने शहरातील फ्रीडम शाळेच्या परिसरातील मंजूर अभिन्यासातील रस्त्यावर करण्यात आलेल्या कथित अतिक्रमणाबाबत कठोर भूमिका घेत संबंधितांना २४ तासांच्या आत अनधिकृत बांधकाम हटविण्याची नोटीस बजावली आहे.




नगरपरिषदेच्या नगररचना विभागाकडून जारी करण्यात आलेल्या नोटिशीनुसार, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ५३(१) व ५४ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. फ्रीडम शाळेचे संचालक मनोज बा. झाडे यांना पाठविण्यात आलेल्या नोटिशीत सं. नं. ०८, नझुल शीट क्रमांक १८ व नझुल प्लॉट क्रमांक २४ मधील मंजूर अभिन्यासातील ६ मीटर रुंद रस्त्यावर अतिरिक्त बांधकाम करून अतिक्रमण केल्याचे निदर्शनास आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

नगरपरिषदेने संबंधित बांधकाम अनधिकृत असल्याचे सांगत नोटीस प्राप्त झाल्यानंतर २४ तासांच्या आत अतिक्रमण काढून जमीन पूर्ववत स्थितीत आणावी तसेच अनधिकृत वापर तात्काळ थांबवावा, असे निर्देश दिले आहेत.

नोटिशीतील आदेशांचे पालन न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमातील कलम ५२ व ५३ नुसार संबंधितांविरुद्ध खटला दाखल करण्यात येईल. तसेच नगरपरिषदेमार्फत थेट अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात येणार असून त्यासाठी होणारा खर्च व जबाबदारी संबंधितांवर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे.

मुख्याधिकारी शशिकांत मारोती बाबर यांनी ही नोटीस जारी केली असून अतिक्रमण निर्मूलन पथकाचे प्रमुख विजय भोंडे यांना पुढील कार्यवाहीसाठी प्रत पाठविण्यात आली आहे. नगरपरिषदेच्या या कारवाईमुळे शहरातील इतर अतिक्रमणधारकांमध्येही खळबळ उडाली आहे. अतिक्रमण ही अकोट शहरात समस्या बनली आहे.

# आर.डी.जी. शार्क पूल सीझन-1 चा भव्य समारोप

प्रतिनिधी २२ जून




**अकोला :** येथील आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये २० जून रोजी आर.डी.जी. शार्क पूल सीझन-१ ची ग्रँड फायनल उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेला हा एक आगळावेगळा नवोन्मेष व उद्योजकता उपक्रम असून, १८ वर्षांखालील विद्यार्थ्यांच्या कल्पक संकल्पनांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांना गुंतवणूकदारांशी जोडणे आणि त्यांच्या कल्पनांचे यशस्वी व्यवसायांमध्ये रूपांतर करण्यासाठी मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ मिळवून देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

आज अनेक विद्यार्थ्यांकडे नाविन्यपूर्ण कल्पना, तांत्रिक कौशल्ये आणि समाजातील समस्यांवर प्रभावी उपाय असतात; मात्र अशा कल्पना सादर करण्यासाठी, त्यांना दिशा देण्यासाठी आणि आवश्यक निधी मिळवून देण्यासाठी योग्य व्यासपीठांची कमतरता जाणवते. ही दरी भरून काढण्यासाठी आर.डी.जी. पब्लिक स्कूलने शार्क पूलची संकल्पना साकारली. युवा नवोन्मेषकांच्या स्वप्नांना पंख देण्याचा हा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

पहिल्याच सीझनमध्ये या उपक्रमाला देशभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. स्पर्धेसाठी एकूण १४३ अर्ज प्राप्त झाले होते. त्यातून निवड झालेल्या १० स्पर्धकांनी ग्रँड फायनलमध्ये आपल्या प्रकल्पांचे सादरीकरण केले.

# बर्थडे पार्टीनंतर मृत्यूचा थरार, कारच्या उडाल्या चिंधड्या, तरुण-तरुणीचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** वाढदिवस साजरा केल्यानंतर मित्रांसोबत हाय-स्पीड ड्राईव्हवर गेलेल्या तीन तरुणांचा प्रवास अवघ्या काही मिनिटांतच एका भयंकर अपघातात बदलला. नवी मुंबईजवळील बदलापूरमध्ये एका आलिशान बीएमडब्ल्यू कारचा भीषण अपघात झाला आहे. वाढदिवस साजरा केल्यानंतर मित्रांसोबत हाय-स्पीड ड्राईव्हवर गेलेल्या तीन तरुणांचा प्रवास अवघ्या काही मिनिटांतच एका भयंकर अपघातात बदलला. मुंबई-बडोदा महामार्गावर भरधाव वेगात असलेल्या बीएमडब्ल्यू कारच्या झालेल्या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एक तरुण गंभीर जखमी आहे. हा अपघात इतका भयंकर होता की, कारचा अक्षरशः चुराडा झाला आणि मृतदेहांचे अवयव दूरवर विखुरले गेले. अपघाताच्या वेळी कारचा वेग तब्बल २५० किलोमीटर प्रति तासापेक्षा जास्त असल्याचं सांगितलं जात आहे. योगेश नेगी (वय २६, रा. बदलापूर) आणि रेबेका जेकब (वय -२४, रा. वांद्रे) असं अपघातात मृत पावलेल्या दोघांची नावं आहेत. योगेशचा वाढदिवस असल्याने त्याने बदलापूर पश्चिमेला मित्रांसोबत पार्टी केली होती. पार्टीनंतर रविवारी, २१ जूनच्या मध्यरात्री योगेश, रेबेका आणि कारचा मालक अंगद हे तिघेही



निर्माणाधीन असलेल्या मुंबई बडोदा एक्स्प्रेसवेवर फेरफटका मारण्यासाठी गेले होते. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी पहाटेच्या सुमारास हा भीषण अपघात झाला. बीएमडब्ल्यू कार टिटवाळ्याहून बदलापूरच्या दिशेने येत होती. एरंजाड परिसराजवळ चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि भरधाव कार थेट दुभाजकावर जाऊन आदळली. ही धडक इतकी जोरदार होती की, कार अनेक वेळा पलटी खात रस्त्यावर घासत गेली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यरात्री २ ते ३ च्या सुमारास बीएमडब्ल्यू एक्स्प्रेसवेवर अतिशय वेगाने धावत होती. एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, 'कार दोनदा खूप वेगाने निघून गेली. तिसऱ्या वेळी एका मोठ्या स्फोटासारखा आवाज आला. आम्ही घटनास्थळी पोहोचलो तेव्हा कार पूर्णपणे उद्ध्वस्त झाली होती. एक तरुणी कारमधून उडून खूप दूर जाऊन पडली होती आणि काही वेळातच तिचा मृत्यू झाला.'

### चालक बचावला, पोलिसांचा तपास सुरू

या दुर्दैवी घटनेत योगेश आणि रेबेका यांचा जागीच मृत्यू झाला. तर अंगद नावाचा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याला उपचारासाठी ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सुदैवाने त्याची प्रकृती सध्या धोक्याबाहेर असल्याचं सांगण्यात येत आहे. घटनास्थळाची माहिती मिळताच पोलीस आणि फॉरेन्सिक टीम त्वरित तिथे पोहोचली असून अनेक महत्त्वाचे पुरावे गोळा केले जात आहेत. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, अपघाताच्या वेळी चालक दारूच्या नशेत असावा असा संशय आहे, मात्र पोलिसांनी अद्याप याला अधिकृत दुजोरा दिलेला नाही. कार २५० हून अधिक वेगाने चालवणे, निष्काळजीपणा की आणखी काही कारण... या भीषण अपघाताचे खरे कारण पोलीस तपासानंतरच स्पष्ट होईल. एवढ्या भीषण धडकेत अंगद कसा बचावला, एअरबॅग उघडल्या होत्या की आणखी काही कारण होते, याचाही पोलीस शोध घेत आहेत. अंगदचा जबाब नोंदवल्यानंतरच या प्रकरणाचा पूर्ण उलगडा होऊ शकेल. सध्या पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत.

# निफ्टी इंडिया डिफेन्स निर्देशांक : गुंतवणुकीची आकर्षक संधी




प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** निफ्टी इंडिया डिफेन्स निर्देशांकात बुलिश फ्लॅग पॅटर्ननंतरचा दमदार ब्रेकआउट; ८४००-८७०० अंशांचा पट्टा दीर्घकालीन गुंतवणूकदारांसाठी मजबूत सपोर्ट झोन म्हणून उदयास आला. गेल्या काही वर्षांत निफ्टी इंडिया डिफेन्स निर्देशांक हा भारतीय शेअर बाजारातील सर्वांत दमदार कामगिरी करणाऱ्या थीमॅटिक निर्देशांकांपैकी एक ठरला आहे. केंद्र सरकारचे संरक्षण क्षेत्रावरील वाढते लक्ष, संरक्षण खर्चातील सातत्यपूर्ण वाढ, स्वदेशी उत्पादनाला मिळणारे प्रोत्साहन आणि वाढणारी निर्यात यामुळे या क्षेत्राला भक्कम आधार मिळत आहे. गुंतवणूकदार त्यामुळे आकर्षित होतील असा विश्वास देखील व्यक्त केला जातो आहे. सध्याची स्थिती गुंतवणुकीसाठी पोषक असल्याची भावना व्यक्त केली जाते आहे. तसेच अमेरिका इराण युद्ध शमल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात देखील स्थिरता आलेली दिसते आहे.

# 'बेस्ट' कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

## ♦ ३०००, २००० रुपये महिना अंतरिम दिलासा

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** मुंबईची दुसरी जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या 'बेस्ट' बस कर्मचाऱ्यांच्या संपामुळे मुंबईकरांचे हाल होत असतानाच आता एक अत्यंत दिलासादायक बातमी समोर आली आहे. बेस्ट कर्मचाऱ्यांनी पुकारलेला संप अखेर मागे घेण्यात आला आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कर्मचारी संघटनांसोबत सकारात्मक चर्चा करून यावर यशस्वी तोडगा काढला आहे.

कर्मचाऱ्यांच्या समस्या दूर करणार: एकनाथ शिंदे

या संदर्भातील निर्णयाची घोषणा करताना शिंदे म्हणाले, 'बेस्टचे कर्मचारी मुंबईकरांना अहोरात्र अत्यंत चांगली सेवा देत आहेत. या कर्मचाऱ्यांच्या काही



कायदेशीर आणि न्याय्य समस्या होत्या, ज्या सोडवणे गरजेचे होते. सरकार म्हणून आम्ही त्यांच्या सर्व समस्या दूर करण्याचा सकारात्मक निर्णय घेतला आहे. बेस्टच्या प्रश्नांवर मुख्यमंत्र्यांशी देखील काल, आज चर्चा केली आहे. या पर्यायांची अंमलबजावणी करून बेस्टला बेस्ट बनविणार आहोत.' उपमुख्यमंत्री आणि परिवहन मंत्र्यांच्या या आश्वासनानंतर कर्मचारी संघटनांनी संप मागे घेण्यास संमती दर्शवली.

**नियमित आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा**

संपकरी कर्मचाऱ्यांशी झालेल्या चर्चेनंतर सरकारने तात्काळ अंतरिम मदत जाहीर केली आहे. यानुसार: बेस्टचे नियमित कर्मचारी: दरमहा ३,००० (तीन हजार रुपये) अंतरिम रक्कम दिली जाणार. कंत्राटी कर्मचारी : दरमहा २,००० (दोन हजार रुपये) अंतरिम रक्कम दिली जाणार. संप मागे घेतल्यामुळे मुंबईतील बेस्ट बस सेवा पुन्हा एकदा पूर्ववत होणार असून, लाखो नोकरदार आणि सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

# महायुती सरकार मूलभूत जनप्रश्नांकडे लक्ष देण्यात अपयशी; विरोधकांनी विचारला जाब

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सोमवारी सुरू होत आहे. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने सरकारच्या पारंपरिक चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला.

सोमवारपासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण तापले आहे. याच संदर्भात रविवारी महाविकास आघाडीची पत्रकार परिषद घेण्यात आली. यावेळी शिवसेनेचे ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे आणि भास्कर जाधव, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील आणि महाविकास आघाडीचे इतर नेते उपस्थित होते. पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर रविवारी संध्याकाळी सरकारने आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला.

पाणी समस्या तसेच राज्यातील जनतेचे प्रश्न सोडविण्यात सरकार अपयशी ठरल्याचा आरोप विरोधी पक्षनेत्यांनी केला. तसेच येत्या अधिवेशनात सरकारला जाब विचारू असे जयंत पाटील, भास्कर जाधव पत्रकार परिषदेत बोलताना म्हणाले.

# मुंबई वाहतूक व्यवस्थेला शिस्त लावण्याचा प्रयत्न

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** मुंबई ही भारताची आर्थिक राजधानी असून, येथील वाहतूक व्यवस्था ही शहराची जीवनवाहिनी मानली जाते. मुंबईतील वाहतूक प्रामुख्याने सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून आहे, ज्यामध्ये रेल्वे, बसेस, मेट्रो, मोनोरेल आणि रस्ते वाहतुकीचा समावेश होतो.

मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेचे प्रमुख भाग खालीलप्रमाणे आहेत:मुंबई लोकल रेल्वे, लोकल रेल्वे ही मुंबईची सर्वात महत्त्वाची आणि सर्वात मोठी जीवनवाहिनी आहे. दररोज लाखो प्रवासी यातून प्रवास करतात. ही व्यवस्था प्रामुख्याने तीन मार्गांवर विभागलेली आहे: सेंट्रल लाईन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ( पासून कल्याण, कर्जत आणि कसारा पर्यंत. वेस्टर्न लाईन चर्चगेटपासून डहाणू रोडपर्यंत, हार्बर लाईन सीएसएमटीपासून गोरेगाव आणि नवी मुंबईतील पनवेलपर्यंत. मुंबई मेट्रो, मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी आणि लोकलवरील ताण कमी करण्यासाठी मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारत आहे.

सध्या घाटकोपर ते वर्सोवा (लाईन १), आरे ते अंधेरी पूर्व (लाईन ७) आणि डहाणूकरवाडी ते आरे (लाईन २ए) यांसारखे अनेक मार्ग पूर्णपणे सुरू आहेत. कुलाबा-वांद्रे-सीप्झ (लाईन ३) ही पूर्णपणे भुयारी मेट्रो असून, तिच्या काही टप्प्यांचे काम प्रगतीपथावर आहे आणि काही भाग सुरू करण्यात आला आहे. भविष्यात संपूर्ण मुंबई आणि उपनगरांना जोडण्यासाठी मेट्रोचे मोठे जाळे तयार होत आहे. बेस्ट बसेस, 'बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन' बस सेवा ही मुंबईतील अंतर्गत प्रवासासाठी अत्यंत लोकप्रिय आहे. मुंबईतील गल्लीबोळांपर्यंत बेस्ट बसेस पोहोचतात. आता बेस्टच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर वातानुकूलित आणि इलेक्ट्रिक बसेस समाविष्ट करण्यात आल्या आहेत, ज्यामुळे प्रवास अधिक सुकर झाला आहे. 'चलो ॲप' मुळे बसचे लाईव्ह लोकेशन आणि तिकीट काढणे सोपे झाले आहे. रस्ते वाहतूक आणि उड्डाणपूल, मुंबईत उत्तर-दक्षिण जोडणारे प्रमुख रस्ते आहेत: वेस्टर्न एक्सप्रेस हायवे वांद्रे ते दहिसर,

ईस्टर्न एक्सप्रेस हायवे एएश्ऊ/भायखळा ते ठाणे, दक्षिण मुंबईला थेट वांद्रे-वरळी सी-लिंकशी जोडणारा हा नवा आधुनिक मार्ग आहे, ज्यामुळे प्रवासाचा वेळ खूप वाचतो.

मुंबई (शिवडी) ते नवी मुंबई (न्हावा शेवा) यांना जोडणारा हा भारतातील सर्वात लांब सागरी सेतू आहे. टॅक्सी आणि रिक्षा सेवा, काली-पिली टॅक्सी आणि रिक्षा: दक्षिण मुंबईत फक्त टॅक्सी चालतात (रिक्षाला परवानगी नाही), तर सायन आणि वांद्रेच्या पुढे उपनगरांमध्ये रिक्षा आणि टॅक्सी दोन्ही उपलब्ध असतात.

# सिंधुदुर्गात पावसाचं दणक्यात पुनरागमन! घाटमाथ्यावरही धुवाधार; चांगल्या पावसाचा अंदाज

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात पावसाचे पुनरागमन झाल्याने तीन हजार हेक्टरवरील भातरोपांना दिलासा मिळाला आहे. दुबार पेरणीचे संकट टळले असून २४ जूनपर्यंत हवामान विभागाने यलो अलर्ट जारी केला आहे.

वैभववाडी (सिंधुदुर्ग) जिल्ह्यात पावसाचे पुनरागमन झाले. या पावसामुळे पाण्याअभावी संकटात सापडलेल्या तीन हजार हेक्टरवरील भातरोपांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, जिल्ह्याच्या बहुतांशी भागात काल हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. घाटपायथ्याच्या गावांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाच्या जोरदार सरी झाल्या. बहुतांशी भागात पाऊस झाल्यामुळे दुबार पेरणीचे संकट टळले आहे.

या भागात देखील पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहिली जात होती. केव्हा पाऊस होतो याकडे कोकणी माणूस डोळे लावून बसला होता. अखेर पाऊस झाला. पावसाची कोंडी फुटल्याने काही अंशी दिलासा मिळाला आहे. तसेच येत्या काही दिवसांत दमदार पावसाची शक्यता देखील व्यक्त करण्यात आली आहे.

# नवी मुंबईची प्रदूषण पातळी नियंत्रित ठेवण्यावर भर

प्रतिनिधी २२ जून

**नवी मुंबई :** सध्या नवी मुंबईतील हवेची गुणवत्ता (ँघ) समाधानकारक किंवा मध्यम स्वरूपाची असते. शहरात सरासरी इश२.५ पातळी सुमारे ११ ते १९ दरम्यान नोंदवली जाते. तरीही, काही भागांमध्ये (उदा. खारघर, तळोजा) हवेच्या गुणवत्तेत चढ-उतार होतात आणि ती संवेदनशील लोकांसाठी कधीकधी 'अस्वास्थ्यकर' श्रेणीत जाऊ शकते.

शहराच्या आणि परिसरातील रिअल-टाइम (थेट) हवेची गुणवत्ता तपासण्यावर भर दिला जातो आहे.

मुंबईतील हवेच्या मध्यम स्वरूपाच्या गुणवत्तेवर आम्ही असमाधानी; उच्च न्यायालयाने महापालिकेला सुनावले

यू. कामदार यांनी न्यायालयाला सांगितले. महापालिकेच्या 'समीर' एक्यूआय ?पनुसार, गेल्या



आठवड्यात मुंबईतील हवेची गुणवत्ता १०१ ते ११६ दरम्यान होती आणि त्यात सतत चढ-उतार दिसला. एक्यूआय इंडेक्स १०० च्या आत असणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने प्रदूषण नियंत्रण अत्यंत महत्त्वाचे आहे. हरीत ऊर्जा तसेच इलेक्ट्रिकल वाहनांचा वापर करून वातावरण शुद्ध ठेवण्याचा प्रयत्न केला जातो आहे.

# मुंबईकरांचा उकाडा संपला! विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची हजेरी; 48 तास यलो अलर्ट

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** मुंबई, ठाणे, पालघर, रायगडमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा, पुढील ७२ तास सतर्कतेचे आवाहन, विदर्भात मात्र उष्णतेची लाट कायम आहे. गेल्या काही दिवसांपासून असह्य उकाड्याने त्रस्त असलेल्या मुंबईकरांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई आणि उपनगरांसह नवी मुंबई परिसरात आज पहाटेपासूनच विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने जोरदार बॅटिंग सुरू केली आहे. गेल्या काही दिवसांपासून असह्य उकाड्याने त्रस्त असलेल्या मुंबईकरांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई आणि उपनगरांसह नवी मुंबई परिसरात आज पहाटेपासूनच विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने जोरदार बॅटिंग सुरू केली आहे. रविवारी पहाटे पाऊस पडल्यानंतर अचानक कडक ऊन पडल्यामुळे मुंबईकरांनी पावसाची आशा सोडली होती. मात्र, आज पहाटेपासून पावसाने पुन्हा एकदा मुसळधार पावसानं मुंबईला झोडपून काढलं, ज्यामुळे वातावरणात छान गारवा निर्माण झाला आहे. रविवारी पहाटे पाऊस पडल्यानंतर अचानक कडक ऊन पडल्यामुळे मुंबईकरांनी पावसाची आशा सोडली होती. मात्र, आज पहाटेपासून पावसाने पुन्हा एकदा मुसळधार पावसानं मुंबईला झोडपून काढलं, ज्यामुळे वातावरणात छान गारवा निर्माण झाला आहे. या मान्सूनच्या प्रवासाबाबत आणि हवामान प्रणालीबाबत भारतीय हवामान विभागाने अत्यंत महत्त्वाची अपडेट दिली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईसह संपूर्ण किनारपट्टीवर पावसाचा जोर



वाढणार आहे.या मान्सूनच्या प्रवासाबाबत आणि हवामान प्रणालीबाबत भारतीय हवामान विभागाने अत्यंत महत्त्वाची अपडेट दिली आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, मुंबईसह संपूर्ण किनारपट्टीवर पावसाचा जोर वाढणार आहे. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर आणि रायगड या पाच जिल्ह्यांमध्ये पुढील ७२ तास मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असून दक्षिण मुंबईत ढगांच्या गडगडाटासह पावसाचा जोर अधिक आहे.

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर आणि रायगड या पाच जिल्ह्यांमध्ये पुढील ७२ तास मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले असून दक्षिण मुंबईत ढगांच्या गडगडाटासह पावसाचा जोर अधिक आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दक्षिण-पश्चिम मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. २३ जूनच्या आसपास मान्सून महाराष्ट्र, तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या आणखी काही भागांमध्ये पुढे सरकणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दक्षिण-पश्चिम मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी अत्यंत अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. २३ जूनच्या आसपास मान्सून महाराष्ट्र, तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या आणखी काही भागांमध्ये पुढे सरकणार आहे. पंजाबपासून बिहारपर्यंत पसरलेला मोसमी ट्रफ आणि उत्तर गुजरातपासून अरबी समुद्रापर्यंत ५.८ किलोमीटर उंचीवर सक्रिय असलेल्या हवामान प्रणालीमुळे मान्सूनचा जोर वाढला आहे. महाराष्ट्रात आज कमाल तापमानात फारसा बदल होणार नसला, तरी उद्यापासून पुढील ३ दिवसांत राज्याच्या तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसची मोठी घसरण पाहायला मिळेल, ज्यामुळे उकाडा कमी होईल. पंजाबपासून बिहारपर्यंत पसरलेला मोसमी ट्रफ आणि उत्तर गुजरातपासून अरबी समुद्रापर्यंत ५.८ किलोमीटर उंचीवर सक्रिय असलेल्या हवामान प्रणालीमुळे मान्सूनचा जोर वाढला आहे. महाराष्ट्रात आज कमाल तापमानात फारसा बदल होणार नसला, तरी उद्यापासून पुढील ३ दिवसांत राज्याच्या तापमानात २ ते ३ अंश सेल्सिअसची मोठी घसरण पाहायला मिळेल, ज्यामुळे उकाडा कमी होईल.

# विजांच्या कडकडाटासह पावसाची दमदार एन्ट्री, आठवड्याच्या सुरुवातीला मुंबईकर सुखावले

प्रतिनिधी २२ जून

**मुंबई :** पूर्वमोसमी पावसाने मुंबईसह उपनगरांमध्ये सोमवारी सकाळीच हजेरी लावली. त्यामुळे नागरिकांच्या आठवड्याची सुरूवात दिलासादायक झाली. आता येत्या दोन-तीन दिवसांत शहरात मान्सून दाखल होण्याचा अंदाज आहे.

सोमवारी सकाळीच मुंबईसह उपनगरांमध्ये जोरदार पावसाने हजेरी लावल्यामुळे मुंबईकरांच्या आठवड्याची सुरूवात सुखकर झाली आहे. रविवारी सकाळीही काही काळ पूर्व-मोसमी पावसाने हजेरी लावली होती. पण त्यानंतर दिवसभर वातावरणात उकाडा कायम होता. पण सोमवारी सकाळी मेघगर्जेसह पावसाने हजेरी लावल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला.



जून महिन्याचे तीन आठवडे संपले तरी कडक ऊन, वाढता उष्मा व पावसाचा लवलेश नसल्याने आकाशातील पांढरे ढग पाहून त्रस्त झालेल्या मुंबई व मुंबई महानगर प्रदेशातील नागरिकांना रविवारी पहाटे पावसाच्या हलक्या सरी व शिडकाव्याने काहीसा दिलासा दिला. मुंबईतील अनेक भागांसह ठाणे, अंबरनाथ, नवी मुंबई, बदलापूर, मुरबाड परिसरात काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरींनी हजेरी लावली. त्यानंतर सोमवारी सकाळी पुन्हा एकदा पावसाचं दर्शन झाल्यामुळे मान्सूनच्या आगमनाकडे मुंबईकरांचं लक्ष लागलं आहे. त्यात ठाणे, नवी मुंबईसह अनेक भागांमध्ये पाणी टंचाईची समस्या उद्भवली असून या पावसामुळे नागरिकांना आशा मिळाली आहे.

**हवामान विभागाचा अंदाज काय ?**

हवामान विभागाच्या अंदाजानुसार मान्सूनचा वेग पुन्हा हळूहळू वाढत असून २४ जूनपर्यंत मुंबई-पुण्यात दाखल होण्याची शक्यता आहे. त्यानुसार २२-२३ जून रोजी मुंबईसह उपनगरांमध्ये मेघगर्जनेसह पावसाचा यलो अलर्ट दिला होता. पण यापूर्वी दिलेल्या अनेक तारखांना पाऊस आलाच नसल्यामुळे मुंबईकरांच्या पदरी यंदाही निराशाच पडेल का अशी भीती व्यक्त केली जात होती. पण पूर्व-मोसमी पावसाच्या हजेरीमुळे मान्सून लवकरच शहरात धडकणार हे स्पष्ट झालं आहे.

सोमवारी सकाळी ६.३०च्या सुमारास पश्चिम उपनगरांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची नोंद झाली. गोरेगाव, वांद्रे, नवी मुंबईमध्ये काही काळासाठी मुसळधार पाऊस सुरू होता. या सरींमुळे सकाळच्या वातावरणात गारवा पसरला असून मान्सूनच्या प्रगतीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. अद्याप हवामान विभागाने मुंबईत मान्सून दाखल झाला याची घोषणा केली नसली तरी येत्या काही दिवसांत मान्सूनच्या आगमनाची दाट शक्यता आहे.

**कोणत्या जिल्ह्यांमध्ये 'यलो अलर्ट' ?**

२४ जूनपदरम्यान मुंबईसह ठाणे, पालघर, रायगड आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे. ताशी ४० किमी वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यांसह अनेक भागांत मुसळधार पाऊस होण्याची शक्यता आहे. कोकण, गोवा, मराठवाड्यात काही ठिकाणी पावसाची नोंद झाली असून मान्सूनच्या सरींची शक्यता आहे. हवामान विभागाने यवतमाळ, नागपूर, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. येत्या ४८ तासांत महाराष्ट्रातील बहुतांश भागांमध्ये मोसमी वाऱ्यांना वेग मिळणार असून मुसळधार पावसाची शक्यता आहे. मुंबईमध्ये कमाल तापमान ३४ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २८ अंश सेल्सिअस राहण्याची शक्यता आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय ओम शिव साई सीएचएस, पहिला मजला, बीएमसी मार्केट, रनवाल व ओंकार ई-स्क्वेअर जवळ, सायन (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र – ४०००२२. येथे प्रकाशित केले. ■ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ■ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135